**महाराष्ट्र राज्य सहकारी अपिल न्यायालय, मुंबई खंडपीठ या कार्यालयाचे दि.०१.०३.२०२६ ते दि.२८.०२.२०२७ या ०१ वर्षाच्या कालावधीकरीता भाडेकरार करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन,**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,**
**शासन निर्णय क्रमांकः जाभाक- २०२५/प्र.क्र.४/२२ स,**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०००३२
दिनांक- ०२ जुलै, २०२६.

**<u>वाचा</u>**: १) विभागाचा शासन निर्णय क्र. जाभाक/२०२५/प्र.क्र.०४/२२-स, दिनांक २५.०३.२०२५.
२) सहकार आयुक्त तथा निबंधक महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था, पुणे यांचे पत्र क्र. स.आ-१५/सवंका/कार्या.भाडे/म.रा.सह.अपिल.न्याया.मुंबई/४९७/२०२६, दि. १६/०६/२०२६.

**<u>प्रस्तावना :-</u>**

संदर्भाधीन क्र.१ च्या पत्रान्वये महाराष्ट्र राज्य सहकारी अपिल न्यायालय, मुंबई हे न्यायालय व या न्यायालयाच्या अधिनस्त सहकार न्यायालय क्रमांक १ ते ४ ही न्यायालये मे. स्टील क्रेस्ट प्रा. लि., एपीजे हाऊस, ३ दिनशा वाच्छा रोड, चर्चगेट, मुंबई-२० यांच्या मालकीच्या जागेत ३ रा, ५ वा व ६ वा या मजल्यावर एकूण १४६६० चौ.फूट इतक्या जागेचा भाडे करारनामा दि.२८.०२.२०२६ रोजी संपुष्ठात आला आहे. तरी महाराष्ट्र राज्य सहकार अपील न्यायालय, मुंबई व मे. स्टील क्रेस्ट प्रा. लि., एपीजे हाऊस, ३ दिनशा वाच्छा रोड, चर्चगेट, मुंबई-२० यांच्यातील द्विपक्षीय जागेचा नवीन भाडेकरार दिनांक ०१.०३.२०२६ ते दिनांक २८.०२.२०२७ या कालावधीसाठी भाडे प्रति रु.२२३.८१ चौ.फूट या दराने दरमहा रु.३२,८१,०८८.१७/- (दरमहा + १८% जी.एस.टी.सह) व इतर अटी-शर्ती मागील कररारनाम्याप्रमाणे, जागेचा नवीन भाडे करारनामा दि.०१.०३.२०२६ ते दि.२८.०२.२०३१ या एकूण ५ वर्षांपर्यंत कालावधीकरिता करण्यास सहकार आयुक्त तथा निबंधक महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था, पुणे यांनी संदर्भाधीन क्र.२ च्या पत्रान्वये सादर केलेला प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन होता.

**शासन निर्णय :-**

महाराष्ट्र राज्य सहकारी अपिल न्यायालय, मुंबई हे न्यायालय व या न्यायालयाच्या अधिनस्त सहकार न्यायालय क्रमांक १ ते ४ ही न्यायालये मे. स्टील क्रेस्ट प्रा. लि., एपीजे हाऊस, ३ दिनशा वाच्छा रोड, चर्चगेट, मुंबई-२० यांच्या मालकीच्या जागेत ३ रा, ५ वा व ६ वा या मजल्यावर एकूण १४६६० चौ.फूट इतक्या जागेत कार्यरत आहेत. सदर जागेचा भाडे करारनामा दिनांक २८.०२.२०२६ रोजी संपुष्ठात आला आहे. तरी सदर न्यायालयीन जागेचा नवीन भाडे करारनामा दिनांक ०१.०३.२०२६ ते दिनांक २८.०२.२०२७ या ०१ वर्षाच्या कालावधीकरीता दरमहा भाडे प्रति रु.२२३.८१ चौ.फूट या दराने रु.३२,८१,०८८.१७/- (दरमहा भाडे + १८% जी.एस.टी.सह) व यापूर्वी केलेल्या करारनाम्याच्या अटी-शर्ती प्रमाणे जागा भाडयाने घेण्यास व भाडे प्रदान करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२.	हे आदेश वित्त विभाग, वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ मधील अ. क्र. १०, नियम ११५ अन्वये कार्यालयासाठी जागा भाड्याने घेण्यास व भाडे प्रदान करण्यास मंजूरी देण्याबाबत प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

३.	उक्त शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०७०२१२३०४७०००२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ANKUSH PANDURANG SHINGADE

Digitally signed by ANKUSH PANDURANG SHINGADE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=CMTD, 2.5.4.20=0619305C0A0825664EFA457FFA51C3F2364841C81F8C437078A333B7111446A2, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E11F71FCAC231B0F91F430636DE14F6C49B569D173346155B9208DCD97DD078B, cn=ANKUSH PANDURANG SHINGADE
Date: 2026.07.02 12:31:41 +05'30'

(अंकुश शिंगाडे)

**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत :-**

१. प्रधान सचिव ( सहकार व पणन ),सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग , मंत्रालय, मुंबई,
२. सहकार आयुक्त तथा निबंधक महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था, पुणे,
३. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकार अपिल न्यायालय, मुंबई,
४. निबंधक, महाराष्ट्र राज्य सहकार अपिल न्यायालय, मुंबई,
५. महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई
६. महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता) महराष्ट्र राज्य, नागपूर
७. महालेखापाल-१ (लेखापरिक्षण) महाराष्ट्र राज्य, मुंबई
८. महालेखापाल-२ (लेखापरिक्षण) महाराष्ट्र राज्य,
९. निवड नस्ती (२२-स).